Rotary
Club of Latur Mid-town

UNITE FOR GOOD

# रोटरी दिशा

## ROTARY CLUB OF LATUR MID-TOWN

**ROTARY INTERNATIONAL DISTRICT 3132 | Club No.: 22604**

## July - 2025



**Rtn.Francesco Arezzo**
RI President 2025-26



**Rtn.Sudhir Lature**
Dist.Governor 2025-26



**Rtn.Amol Dadge**
President



**Rtn.Pavan Malpani**
Secretary

## Table of Contents


- Editorial
- Membership
- Birthday & Anniversary
- RI President
- Word Puzzle
- TRF Donors
- Annapurna Donors
- Dist.Governor Message
- DG Installation Photos
- Asst.Governor Message
- Past Secretary Message
- July Projects
- President Message
- Secretary Message
- Installation Ceremony
- Board Of Directors
- Kitchen Chronicles


# संपादकीय मनोगत



सप्रेम नमस्कार,रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊनच्या दिशा या नव्या बुलेटिनच्या पहिल्या अंकात आपण सर्वांचे मनःपूर्वक स्वागत करताना मला अतिशय आनंद होत आहे.रोटरी म्हणजे सेवा, समर्पण आणि समाजप्रती उत्तरदायित्व. याच मूल्यांना समर्पित राहून, आपल्या क्लबच्या उपक्रमांची, यशोगाथांची आणि सामाजिक बांधिलकीची एक सशक्त आणि प्रेरणादायी झलक दिशाच्या माध्यमातून आपल्यासमोर मांडण्याचा हा प्रयत्न आहे.या पहिल्या अंकापासूनच, केवळ उपक्रमांची माहिती न देता, त्यामागचे प्रयोजन, त्याचा परिणाम आणि त्यातून उमलणारे अनुभव मांडण्याचा आमचा मानस आहे. रोटरीच्या प्रत्येक सदस्याचा सहभाग, योगदान आणि प्रेरणा हीच दिशाची खरी शक्ती ठरेल.संपादन ही माझ्यासाठी केवळ जबाबदारी नसून एक संधी आहे आपल्या सर्वांच्या कार्याला शब्दरूप देण्याची, आणि त्यातून नव्या विचारांना दिशा देण्याची. हा अंक हा प्रारंभ आहे एका सातत्यपूर्ण संवादाचा, जिथे आपला प्रत्येक रोटेरियन अनुभव, विचार आणि कार्याच्या माध्यमातून दिशा दाखवणार आहे.आपल्या प्रतिक्रिया, सूचना आणि सहभागाची मी आतुरतेने अपेक्षा करतो.आपल्या सर्वांच्या सहकार्याने दिशा एक प्रेरणादायी आणि प्रभावी व्यासपीठ बनेल, हीच अपेक्षा!रोटरी सेवा हीच खरी दिशा.

आपला,
रो.अमोल बनाळे
संपादक,दिशा बुलेटिन
रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊन

## Welcome to Rotary Family
(Membership this month)



Vijay Shivpuje



Krishnat Akangire



Kishan Kuleria



Laxman Done

## Birthdays

- ♦ Dr. Uday Deshpande - 6 July
- ♦ Kalash Mundada - 12 July
- ♦ Shrikant Panchakshari - 14 July
- ♦ Ravindra Bankar - 16 July
- ♦ Pratik Somani - 20 July
- ♦ Sagar Bora - 26 July
- ♦ Girish Pensalwar - 27july



## Anniversaries

- ♦ Dr Sanjay Shivapuje - 1 July
- ♦ Amar Agrawal - 5 July
- ♦ Vishal Ayachit - 7 July
- ♦ Dr. Shriniwas Bhande- 15 July



# Rtn.Francesco Arezzo RI President Message



Two weeks ago, I was in my living room playing with my grandchildren. A few days later, I was on a plane to Calgary, suddenly carrying the responsibility of leading this incredible organization. Life comes fast, but so often, it brings us exactly where we're meant to be.

We begin this year with a clear message/; Unite for Good. It is a simple phrase, but a powerful one. Because behind every successful Rotary effort, every act of service, every new member welcomed, every global challenge met-there are two things that matter most: friendship and trust.

This is how we build strong clubs. It's how we create meaningful partnerships and transform global problems into local solutions. It's also how we lead-not through titles or applause, but with humility, humanity, and heart. But let me be honest with you-this kind of leadership is not always easy. We're human and yes, we make mistakes. We sometimes disagree, but in Rotary, we are called to something greater. let us reflect on the full vision of Rotary: Together, we see a world where people unite and take action to create lasting change – across the globe, in our communities, and in ourselves.

The last part is essential, because transformation doesn't start with strategy. It starts with character and the way we treat one another. It starts with how we listen, how we support, and how we serve.

This year, I ask you to lead with that spirit. To grow Rotary through relationships. To make your clubs more welcoming, more flexible, more open to new ideas. To think big-but also to think beyond one year. Our term is short, but our impact can be lasting if we plan and act with continuity and vision.


Let us remember our key priorities: membership, polio and peace. We are closer than ever to ending polio. We cannot stop now. We must keep the promise we made tot he children of the world. And as for peace-Rotary has been building it for over a century. Every clean water system, every youth exchange, every maternal health project is a step toward peace.

I joined Rotary as a young professional, eager to help but terrified of public speaking. My fellow Rotarians believed in me and encouraged me to take on new roles, and in doing so, Rotary changed my life. It gave me courage and purpose, but above all, it gave me you: my friends, my team, my family around the world.

So now, my friends…take out your dreams tucked away in a drawer, especially those you thought were too big or bold to achieve. Let's bring them into the light. Let's Unite for Good-for our clubs, our communities, and our world. And let's make this a year not only of service, but of joy, of connection, and of love.

**Rtn. Francesco Arezzo**
President,
Rotary International 2025-26

### Solve The Puzzle




**DOWN**

2. Rotary-sponsored service club for young people aged 12-18.
3. .... Way Test
4. Rotary Founder...Harris
5. TRF Stands for The ... Foundation

**Across:**

1. Rotary helped achieve a ... -free status for India in 2014.
6. Short form of Rotary Youth Leadership Awards
7. Rotary-sponsored club for young adults.

### Thank You Donors
(TRF this Month)




Rtn.Amol Dadge
APF - 1000$
Polio Fund - 200$

### Thank You Donors
(Annapurna this Month)

H-T

**HY - TECH Engineering Ltd.**
Plot No. A-160, Main Road, Wangle Industrial Estate, Thane

**1 Lakh Rs**



**Mr.Prabhakarrao Rodge**
**5000 Rs**

# रो. सुधीर लातूरे डिस्ट्रीक्ट गव्हर्नर, रोटरी डिस्ट ३१३२ संदेश



प्रिय रोटरी परिवार,

रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊन यांना त्यांच्या पहिल्या बुलेटिनच्या प्रकाशनाबद्दल मनापासून शुभेच्छा. या बुलेटीन द्वारे आपल्या कार्यांची विविधता, यशस्विता आणि रोटरीचे मूल्य समाजासमोर मांडण्याची चांगली संधी आहे.

या बुलेटिनमधील विविध गतिविधी, डिस्ट्रीक्ट ३१३२ च्या बातम्या, आणि रोटरी आंतरराष्ट्रीय माहिती वाचल्याने प्रत्येक रोटेरियन आणि त्यांच्या परिवारास रोटरीच्या विविध पैलूंची अधिक चांगल्या पद्धतीने माहिती मिळेल. हे बुलेटिन केवळ माहितीपुरतेच नाही, तर प्रत्येक वाचकाला अधिक जाणकार आणि प्रेरित रोटेरियन बनवते. हे बुलेटीन जास्तीत जास्त मित्र, परिवार आणि समाजामध्ये शेअर करावे. जेव्हा लोकांना रोटरी ने समाजासाठी केलेल्या कामाची माहिती वाचायला मिळेल, तेव्हा रोटरी ची प्रतिमा आणि प्रतिष्ठा आणखीन वाढेल.

या वर्षी, रोटरी इंटरनॅशनल अध्यक्षांचा मेसेज : Unite for Good या संदेशाने आपल्याला प्रेरणा मिळते. या घोषणेप्रमाणे, आपण सर्व जण एकत्र येऊन, सीमा ओलांडून, विभागांमध्ये आणि समाजांमध्ये सहकार्याने स्थायी आणि सकारात्मक बदल घडवूया. रोटरीचे सामूहिक सामर्थ्य आणि एकता आपल्याला जगात सकारात्मक बदल घडवण्याची ताकद देते.

रोटरी इंटरनॅशनलच्या प्लॅननुसार स्थानिक आणि जागतिक शांतता आणि सामंजस्य निर्माण करणे, रोटरीची क्षमता वाढविणे आणि सार्वजनिक प्रतिमा उजळवणे यांचा प्रयत्न केला पाहिजे. आपण अधिक प्रभावी, नाविन्यपूर्ण मार्ग चोखाळणे आणि सामूहिक प्रयत्न करावेत, जेणेकरून आपल्या समाजात आणि जगात चांगले परिवर्तन घडवता येईल.

आम्ही या योजनेच्या दिशेने पुढे जाताना, विविधता, समरसता आणि समावेशकता (D.E.I.) या मूल्यांना जागरूकपणे स्वीकारण्याचा आग्रह करतो. या मूल्यांनी आपली वाढ आणि यशस्विता निश्चित होते. तसेच, रोटरीची चतुरंग जीवनदृष्टी- खरेपणा, न्याय, चांगुलपणा आणि उपयुक्तता - या मूल्यांना जपणे ही आपली जबाबदारी आहे.

तुम्ही सर्व सदस्यांचं कौतुक करतो, विशेषतः बुलेटिनचे संपादक अमोल बनाळे आणि प्रकाशन टीमला, कारण त्यांची मेहनत आणि समर्पण या पुढील आवृत्तींसाठी आधारभूत आहे. भविष्यातही अशाच प्रेरणादायक, माहितीपूर्ण आणि प्रभावी प्रकाशनांची अपेक्षा ठेवतो.

शेवटी, रोटरीचा मंत्र: Service above self हे लक्षात घेऊन, तुम्हाला आवाहन करतो की, सक्रिय राहा, प्रेरित रहा आणि रोटरीच्या कार्यात नियमितपणे सहभागी व्हा. Unite for Good या घोषणेखाली एकत्र येऊन, आपण नक्कीच समाजात मोठा फरक निर्माण करु शकतो.

आपल्या यशस्वी भविष्यासाठी हार्दिक शुभेच्छा!



आपला,
सुधीर आणि संगीता लातूरे,
डिस्ट्रीक्ट ३१३२








**DG Installation Ceremony Highlights**

## Assistant Governor Message



Dear rotarian friends

First of all I congratulate you all for starting a great journey of rotary year 2025- 26 with new leaders who are amongst us. While travelling throughout the year, we all should work together unitely keeping in the mind the logo of the rotary international " service above self " ,as well as in accordance with the four way test, which we rotarians always keep in our mind.
At the same time we should follow and consider the presidential theme of this year "Unite for good ".      Unite for good
A path towards a better tomorrow.
In a world , often divided by borders, beliefs and various backgrounds , such as political, economical , social etc , the idea of Uniting for good, stands as a powerful reminder of what we can achieve together. When individuals came together with a shared purpose, to uplift support and care for one- another , a great change is possible.

Unite for good means setting aside differences , to work for the common benefit of humanity. Whether it's helping during disasters , standing up for justice or supporting education and healthcare , unity multiplies our strength. History has shown that when people join hands , they can end conflicts , eradicate diseases and build peaceful communities.

If we all think good , do good and speak good , then automatically people came together , join us in various good projects , to be done in the society in all seven focus areas of the rotary international , which will definitely bring positive changes for better tomorrow.

Today more than ever we noted to stand together. From climate change to inequality the challenges we face are global and so must be our response. Let us choose compassion over conflict, action over apathy and hope over hate.
Together we can build a future where kindness is the way. Let us Unite for good , not just as a moment but as a movement.

**Rtn. B. H. Shriram Deshpande**
**Assistant Governor**
**Dist. 3132**

## Past Secretary Message



नमस्कार रोटरी मित्रांनो

माझ्यासाठी हा अत्यंत अभिमानाचा व समाधानाचा क्षण आहे की आज मला रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊनच्या सचिव पदाची २०२४-२५ ची जबाबदारी पार पाडली आपला क्लब हा रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ मध्ये चांगल्या उंचीचा क्लब व्हायब्रंट क्लब म्हणून ओळखला जातो त्याचप्रमाणे यावर्षी आम्ही त्याला शोभेल असे कार्य करायचा प्रयत्न केला आहे यावर्षी आम्ही सक्सेसफुली ५१ साप्ताहिक मीटिंग घेऊ शकलो त्यामध्ये काही ब्रेकफास्ट, डिनर, लंच व फॅमिली मीटिंग घेतल्या व जॉइंट सहित १३ मीटिंग घेतल्या क्लब असेंबली ४ घेतल्या त्याचबरोबर यावर्षी क्लबचे बारा बुलेटिन काढले व त्याचे ई प्रकाशन केले, वर्षाची सुरुवात नरसिंह मंदिरात पूजा आरतीने सर्व रोटरी परिवारासोबत करून केली, पीडीजी स्वाती हेरकर व पीडीजी विजय भाऊ राठी यांच्या पुढाकाराने रोटरी क्लब ऑफ लातूर होरायजन व रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊन आणि विवेकानंद कॅन्सर हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमानाने एक ग्लोबल ग्रँट करण्यात आला कॅन्सर डिटेक्शन व्हॅन तयार करण्यात आली, रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊन चा मेगा ड्रॉइंग कॉम्पिटिशन घेण्यात आली, तसेच आपला पर्मनंट प्रोजेक्ट रोटरी अन्नपूर्णा योजना याच्या फंड रेजिंगसाठी आपण एक नाटक घेतलं २१७ पद्मिनी धाम व त्यातून आपण एक चांगला फंड रेसिंग करू शकलोआपल्या क्लब कडून लातूरमध्ये लातूर बिल्ड एक्सपो घेण्यात आला हा एक्सपो टाऊन हॉल येथे घेण्यात आला याच्यामध्ये शंभर प्लस स्टॉल होते त्याचे उद्घाटक माजी मंत्री मा.अमित भैया देशमुख तसेच उमरग्याचे आमदार प्रवीण जी स्वामी, सर्व रोटरी परिवार यांच्या उपस्थितीत पार पडला, मी ही जबाबदारी अध्यक्ष चेतन पंढरीकर व बोर्ड ऑफ डायरेक्टर व पास्ट प्रेसिडेंट, रोटरी मेंबर्सच्या सहकार्यामुळेच आनंदाने पार पाडू शकलो याचे समाधान आहे, मी या सर्वांचे धन्यवाद व्यक्त करतो व पुढील दिलेली जबाबदारी ही पूर्ण करेन असे सांगून मी थांबतो.

धन्यवाद

आपला,
गिरीश पेन्सलवार, माजी सचिव


1


2


3


4


5


6

### जुलै प्रोजेक्ट्स

1. अस्थिरोग निदान शिबीर
2. रक्तदान शिबीर
3. ॲनिवर्सरी सेलिब्रेशन
4. सीए डे
5. डॉक्टर्स डे
6. रोजगार मेळावा

## अध्यक्षीय मनोगत  रो. अमोल दाडगे  अध्यक्ष, रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊन



नमस्कार रोटरी मित्रहो,

सर्व प्रथम रोटरी वर्ष २०२५-२६ आणि आपल्या रोटरी क्लब ऑफ लातूर मिड टाउनच्या ४२ व्या अध्यक्षपदी कार्य करण्याची मला संधी दिली त्याबद्दल मी आपले मनस्वी आभार व्यक्त करतो.मी स्वतःला भाग्यवान समजतो की मला या रोटरी वर्षात २०२५-२६ मध्ये अध्यक्षपद भुषवण्याची संधी मिळाली, कारण याच वर्षी आपल्या क्लब चे सदस्य माजी अध्यक्ष रो. सुधीर लातुरे हे डिस्ट्रीक्ट गव्हर्नर म्हणून कार्यभार सांभाळणार आहेत. यावर्षी डिस्ट्रीक्ट गव्हर्नर यांचा क्लब म्हणून उल्लेखनीय कार्य होणे अपेक्षित आहे. त्यामुळे यावर्षी मी आणि माझी टीम आपल्यावर आलेली जबाबदारी सर्वजण एकत्रपणे उत्साहात पार पाडण्यासाठी नक्कीच प्रयत्नशील राहणार आहोत.मागील सर्व यशस्वी अध्यक्षांनी आपापल्या काळात अतिशय सुंदर व समाजोपयोगी प्रकल्प घेतलेले आहेत ते या देखील रोटरी वर्षात यशस्वीरीत्या, शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडण्यासाठी आम्ही सर्वजण प्रयत्नशील राहणार आहोत. या वर्षभरात सदस्य वाढवणे,जास्तीत जास्त टिआरएफ जमा करणे, वेगवेगळे समाजोपयोगी कायमस्वरूपी प्रकल्प सीएसआर फंडातून, ग्लोबल ग्रँट च्या माध्यमातुन घेण्यासाठी मी प्रयत्न करणार आहे. आपला क्लब हा व्हायब्रंट आणि ॲक्टीव्ह क्लब राहण्यासाठी मी सतत प्रयत्न करीत राहणार आहे. प्रत्येक सदस्याची इनव्हॉलमेंट वाढवण्यासाठी आम्हाला प्रयत्न करावे लागणार आहेत. आमच्या क्लबचे प्रांतपाल रो. सुधीर लातुरे, सहाय्यक प्रांतपाल ॲड. श्रीराम देशपांडे, क्लब लर्निंग फॅसीलेटर विरेंद्र फुंडीपल्ले, सर्व माजी अध्यक्ष यांचे मार्गदर्शन व सचिव रो. पवन मालपाणी यांच्या सोबत संचालक मंडळाच्या खंबीर साथीने हे वर्ष खरोखरच क्लबची उंची कायम ठेवण्यासाठी मदतच होईल यात तिळमात्र शंका नाही. यावर्षी क्लब मधील जवळपास सर्वच माजी अध्यक्ष हे डिस्ट्रीक्ट टिम मध्ये कार्यरत राहून देखील मला या रोटरी वर्ष २०२५-२६ मध्ये रोटरी कार्यात सर्वोतोपरी मदत करण्यास कायम तयार असतील या बद्दल मला पुर्ण विश्वास आहे. हे वर्ष मला कायम स्मरणात राहील आणि अभिमान वाटेल यासाठी मी मनस्वी प्रयत्न करणार आहे आणि त्यात मला यश मिळो अशी आई तुळजाभवानीला प्रार्थना करतो..

धन्यवाद

आपला,
अमोल दाडगे, अध्यक्ष

## सचिवांचे मनोगत  रो. पवन मालपाणी  सचिव, रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊन



प्रिय रोटेरियन मित्रांनो,सप्रेम नमस्कार!

रोटरी क्लब ऑफ  लातूर मिडटाऊनच्या सचिवपदाची जबाबदारी माझ्यावर सोपवली याबद्दल मी अत्यंत कृतज्ञ आहे. या सन्मानाबरोबरच एक मोठे कर्तव्यही माझ्यावर आले आहे, आणि मी ते पूर्ण प्रामाणिकपणे पार पाडण्याचा पूर्ण प्रयत्न करेन, याची आपणा सर्वांना खात्री देतो.२००६ साली माजी अध्यक्ष रो. डॉ. पुरुषोत्तम दरक यांनी मला या सेवायज्ञात सहभागी करून घेतले.. याप्रसंगी त्यांना धन्यवाद देणे मी माझे कर्तव्य मानतो.रोटरी हा एक सेवा प्रवाह आहे  ज्यामध्ये समाजहित, सहकार्य, आणि समविचारी लोकांची ऊर्जा यांचा सुरेख संगम आहे. आपला क्लब गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक परिवर्तनासाठी कार्यरत आहे, आणि त्या परंपरेला अधिक बळकट करण्यासाठी मी सचिव म्हणून माझे योगदान देईन.या वर्षी अध्यक्ष रो. अमोल दाडगे यांचे नेतृत्व लाभणार आहे, त्यांच्यासोबत समन्वय साधून सर्व उपक्रमांचे प्रभावी नियोजन, अंमलबजावणी व दस्तऐवजीकरण हे माझे प्रमुख उद्दिष्ट राहील. ह्याच बरोबर आपल्या क्लब साठी अत्यंत अभिमानास्पद बाब म्हणजे आपल्या क्लबचे माजी अध्यक्ष रो. सुधीर जी लातुरे हे ह्या वर्षी प्रांतपाल म्हणून जबाबदारी सांभाळतील. ''सेवा हीच धर्मभावना'' या मूलमंत्राशी बांधिल राहून, दिशा बुलेटिनच्या माध्यमातून आपल्या क्लबच्या उपक्रमांची माहिती प्रत्येक सदस्यांपर्यंत पोहोचवणे ही एक महत्त्वाची जबाबदारी असेल. आपल्या क्लबचे प्रत्येक सदस्य हेच आमचे खरे बळ आहेत. आपली उपस्थिती, सहकार्य आणि मार्गदर्शन हवेहवेसे आहे आणि नेहमी प्रेरणा देणारे आहे. आपण सर्वांनी मिळून या रोटरी वर्षात नवीन उंची गाठूया, समाजासाठी काहीतरी वेगळं आणि चिरस्थायी देणं निर्माण करूया.

शुभेच्छांसह...

आपला,
पवन मालपाणी, सचिव
















**पदग्रहण सोहळा क्षणचित्रे**



नमस्कार रोटरी परिवार,

सणांचा महिना म्हणजे श्रावण महिना.. आणि श्रावण म्हणलं की उपास- तापास आलेच..नेहमीचे शाबुदाण्याची खिचडी, भगर- आमटी खाऊन कंटाळा आलाय..चला तर मग आज काही तरी नविन ट्राय करू या..

**वरई-साबुदाणा डोसा आणि खोबऱ्याची चटणी (उपवासासाठी)**

**साहित्य**

**डोश्याच्या पीठासाठी:**

वरई (भगर / समक तांदूळ) १ कप, साबुदाणा २ टेबलस्पून, दही २ टेबलस्पून , हिरव्या मिरच्या २, कोथिंबीर (बारीक चिरलेली) २ टेबलस्पून, जिरे १ टीस्पून, मीठ चवीनुसार, पाणी अंदाजे २ कप, तूप २ टेबलस्पून

**चटणीसाठी:**

ताजं खोबरं (खवलेलं) १/२ कप, हिरव्या मिरच्या २, शेंगदाणे (सोललेले आणि भाजलेले) २ टेबलस्पून, लिंबू १/४ भाग, साखर १ टीस्पून, मीठ चवीनुसार, पाणी १/२ कप (अंदाजे)

**कृती**

**डोश्याचं पीठ तयार करण्यासाठी:**

१.मिक्सरमध्ये वरई आणि साबुदाणा एकत्र करून बारीक पूड करून घ्या. २. त्यात दही, मीठ, कोथिंबीर आणि हिरव्या मिरच्या घालून थोडं थोडं पाणी घालत बारीक वाटून घ्या. पीठ रवा डोश्याच्या पीठ सारखं असावं किंवा कधी सारखा. ३.तयार पीठ एका भांड्यात काढा आणि त्यात जिरे घाला. ४.नॉन-स्टिक आणि स्क्रॅच-फ्री तवा (जसं की निरलेपचा) जोरावर गरम करा. ५.तवा खूप गरम झाला की त्यावर पीठ एक च'च्याने उंचावरून घाला, ते आपोआप पसरेल आणि आकार घेईल. ६.त्यावर तूप सोडा आणि डोसा खमंग आणि कुरकुरीत होईपर्यंत भाजा. गरम गरम सर्व्ह करा.

**चटणी तयार करण्यासाठी:**

१. मिक्सरमध्ये खोबरं, हिरव्या मिरच्या, भाजलेले शेंगदाणे, लिंबू, साखर, मीठ आणि पाणी घालून बारीक वाटून घ्या.

२. ऐच्छिक: जिऱ्याची फोडणी तुपात घालून वरून ओतू शकता.

खमंग वरई-साबुदाणा डोसा आणि चवदार खोबऱ्याची चटणी उपवासाच्या दिवशी किंवा हलकं नाश्त्यासाठी अगदी परफेक्ट..! बीना मीठाचाही हा खूप छान लागतो, ज्यांनी उपवासात दोन वेळ मीठ खायचा नाही त्यांनी बीना मीठाचा करू शकता.


Rotary
R.I. Dist.: 3132
Club No.: 22604
UNITE FOR GOOD

**Rtn. Ganesh Sawant**
Joint Secretory : Y-2025-26
Secretory : Y-2026-27



**ROTARY CLUB OF LATUR MID TOWN**

**Off.** - Sawant Insurance Services, Tirupati Complex, Nandi Stop, Ausa Road, Latur, Tq/Dist Latur- 413512(MH)
9422611316, 7499739416 sawantliclatur@gmail.com

LIC
भारतीय जीवन बीमा निगम
LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA
MEMBER CHAIRMAN'S CLUB FOR AGENTS
MDRT
सन १९९९ पासून
लातूर मधील प्रसिध्द विमा तज्ञ
**गणेश सावंत**



: LIC चे मिळालेले पुरस्कार :
• M.D.R.T. इंटरनॅशनल अवार्ड (इन्शु.) • शतकवीर व करोडपती विमा प्रतिनिधी
• मिलेनियम विमा प्रतिनिधी • (NFIFWI) औरंगाबाद उत्कृष्ठ विमा प्रतिनिधी मानपत्र

BEST FAMILY HEALTH INSURANCE
STAR Health Insurance



CAR INSURANCE
**बसु सावंत**
Senior Insurance Adviser



**सावंत ALL इन्शुरन्स कन्सल्टींग ऑफीस**
नंदी स्टॉप, प्रमोद सुपर मार्केट
जवळ, औसा रोड, लातूर -४१३५१२
9422611316
7499739416
प्रिमियम भरणा केंद्र

LIC
भारतीय जीवन बीमा निगम



01 - नई पॉलिसी लेना!
02 - बंद पॉलिसी चालू करना!
03 - पॉलिसी पर लोन लेना!
04 - पॉलिसी ट्रान्सफर करवाना!
05 - उत्तराधिकारी का नाम चेंज करना!
06 - बीमा पॉलिसी पर नाम चेंज करना!
07 - बीमा पॉलिसी पर पता चेंज करना!
08 - NACH फार्म भरना!
09 - डुब्लिकेट पॉलिसी बॉन्ड निकलवाना!
10 - पॉलिसी सरेंडर करना!
11 - मनी बैक एवं मैच्योरिटी दिलवाना!
12 - मृत्यु दावा करवाना!